# डॉ. निलेश अपार, उपविभागीय अधिकारी अकोला यांचे कार्यालय

रा.मा.क्र. M.R.C.-81/मौजे चांदूर/ बांधकाम परवानगी/ 27 /2020-2021

**बांधकाम परवानगी**

**महाराष्ट्र ग्राम पंचायत आणि महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना(सुधारणा) अधिनियम 2014 च्या कलम 2 पोट कलम 2 (अ) अन्वये पवानगी**

**( एक वर्षा पर्यंत वैध )**

अर्जदार - श्री दिलीप डि. चौधरी रा. शास्त्री नगर अकोला ता. जि. अकोला

## आदेश

( पारित दिनांक 03 - माहे नोव्हेंबर - 2020 )

अर्जदार श्री दिलीप डि. चौधरी रा. चांदुर ता. जि. अकोला यांनी मौजे चांदुर ता. जि. अकोला येथील स. न. ३०/१ व २९/२ मधील त्यांचे मालकीचे अकृषक भुखंड क्र २६ ते ३५ व १८ ते १९ क्षेत्र २२२६.०५ चौ. मी. भुखंडाचे एकत्रीकरण करुन नकाशाप्रमाणे बांधकाम परवानगी मिळणेबाबत अर्ज सादर केला आहे.

प्रकरणात या कार्यालयाचे पत्र क्र. प्रस्तु१/उविअ/प्रक्र-७/कावी-१०७४/२०१९ दि. १/६/२०१९ नुसार जाहीरणामा काढण्यात येऊन तहसिलदार, अकोला, तलाठी मौजे चांदूर, सचिव ग्राम पंचायत चांदूर यांना प्रसिध्दीसाठी पाठविण्यात आला विहीत मुदतीत कोणत्याही प्रकारचा आक्षेप / हरकत / हितसंबंध या कार्यालयास प्राप्त झालेले नाहीत.

प्रकरणात सहायक संचालक नगर नचना अकोला यांनी त्याचे कार्यालयीन पत्र जा. क्र. बां. प./चांदूर/ग.न.३०/१ व २९/२/ससंनरअ/८२१ दिनांक १६/१०/२०२० अन्वये प्रकरणातील भुखंड मौ. चांदूर ता. जि. अकोला येथील स. क्र. ३०/१ मधील भुखंड क्र. २६ ते ३५ व सर्वे न. २९/२ मधील भुखंड क्र. १८ व १९ क्षेत्र २२२६.०५ चौ. मी वर बांधकाम व एकत्रीकरण व उपविभागणी सह बांधकाम परवानगी अपेक्षिली आहे. अकृषक वापराकरीता महसूल विभागाने एन. ए. पी. – ३४/चांदूर/९३/२००२-०३ दि. १५/१०/२००३ व एन. ए. पी.-३४/चांदूर/९२/२००२०३ दि. ०१/०४/२००४ रोजी अकृषक आदेश पारित केले आहेत. प्रस्तावित भुखंड एकत्रिकरणासह बांधकाम परवानगी प्रकरणी मंजूर प्रादेशीक योजना करीता मंजुर असलेल्या बांधकाम विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली नुसार छाननी करुन अर्जदार यांचेकडुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२४ अन्वये विकास शुल्क रु. ५७८८३३ (अक्षरी रु. पाच खाल अठ्याहत्तर हजार आठशे तेहतीस फक्त) वसुल करुण अटी / शर्तींना अधीन राहून बांधकाम नकाशांना प्रस्तावित भुखंड एकत्रीकरण व उपविभागणी नकाशांसह मंजुरीची शिफारस केली आहे.

त्यानुसार अर्जदार श्री दिलीप डी. चौधरी रा. चांदूर ता. जि. अकोला यांना त्यांचे मालकीचे अलसेले मौजे चांदूर ता. जि. अकोला येथील शेत स. न. / गट न ३०/१ भु. क्र. २६ ते ३५ व स. न. २९/२ मधील भुखंड क्र. १८ व १९ क्षेत्र २२२६.०५ चौ. मी भुखंडाचे सहायक संचालक नगर रचना विभाग अकोला यांचे शिफारशीचे नुसार खालील प्रमाणे प्रस्तावित बांधकाम नकाशास तसेच भुखंडास एकत्रीकरण व उपविभागणी नकाशांस अटी व शर्तींस अधिन राहून परवानगी देत आहे.

उप विभागीय अधिकारी कार्यालय, अकोला

एकत्रीत भुखंडाचे क्षेत्र खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | भुखंड क्रमांक | क्षेत्र चौ मी | एकुण क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| १ | ३१ए + ३१बी + ३२ + ३३+ ३४ + ३५ + १९ + २६ + २७ + २८ + २९ + ३०ए + ३० बी + १८ | १३१.२५ + १४२.५० + १५०.०० + १५०.०० + १५०.०० + १५८.०३ + २१६.०० + १६३.९१ + १५०.०० + १५०.०० + १५०.०० + १४२.५० + १५०.०० + २२१.८६ | २२२६.०५ चौ. मी. |

ज्याअर्थी महाराष्ट्र ग्राम पंचायत अणि महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना सुधारणा अधिनियम २०१४ च्या कलम २ पोट कलम २ (अ) अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १८ अन्वये मा. जिल्हाधिकारी यांना प्रदान असलेले अधिकार त्यांचे कार्यालयीन अधिसुचना क्र कक्ष ८/प्रस/मह/प्रक्र१७७५/कावी१५८८/२०१५ दिनांक १५.१०.२०१५ नुसार या कार्यालयास अधिकार प्रदान केले आहेत.

त्याअर्थी याद्वारे महाराष्ट्र ग्राम पंचायत आणि प्रादेशिक नगर रचना (सुधारणा) अधिनियम २०१४ चे कलम २ पोट कलम २ (अ) अन्वये मौजे चांदूर ता. जि. अकोला येथील शेत स. न. ३०/१ मधील भु. क्र. २६ ते ३५ व स. न. २९/२ मधील भुखंड क्र. १८ व १९ क्षेत्र २२२६.०५ चौ. मी. जागेचे सहायक संचालक नगर रचना अकोला यांनी मंजुरीची शिफारस केल्याप्रमाणे एकत्रीकरण व उपविभाजनासह सदर भुखंडावर निवासी वापराचे प्रयोजनासाठी प्रस्तावित बांधकाम नकाशानुसार बांधकाम करण्याची परवानगी खालील अटीस अधिन राहून देत आहे.

<u>अटी-</u>

01. अर्जदाराने नकाशाप्रमाणे ज्योत्या प्रर्यंत बांधकामास परवानगी देण्यात येत आहे.
02. ज्योत्यापर्यन्त बांधकाम केले नंतर सदर बांधकाम मंजुर नकाशाप्रमाणे आहे असे जो पुर्णत्वाचे प्रमाणपत्र Plinth level Completion Certificate) दाखल करुन पुढील बांधकामास परवानगी घ्यावी लागेल.
03. सदरहू बांधकामास परवानगी अन्वये आवेदकाच्या मालकी हककास मंजुरी देण्यात आली असे ग्राह्य धरता येणार नाही किंवा तसा हक्क परवानगी आदेशामुळे प्राप्त होऊ शकत नाही.
04. सदरहू जागेलगतचे रस्त्यावर, गल्लीत, शासकीय जागेवर कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण करता येणार नाही.
05. इमारतीचे बांधकाम पुर्ण झाले नंतर इमारतीच्या उपयोगासाठी भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करुण घ्यावे लागेल. त्याशिवाय इमारतीचा वापर करता येणार नाही.
06. इमारतीचे सांडपाणी अस्तित्वात असलेल्या नालीस जोडावे, अथवा स्वखर्चाने सोकपिट बांधावे.
07. प्रस्तावित बांधकाम भुकंप रोधक असणे आवश्यक राहील.
08. छतावरील पावसाचे पाण्याचे संकलन करण्याकरीता रेन वाटर हार्वेस्टींकची तरतुद करणे बंधनकारक राहील.
09. उद्योग, उर्जा व कामगार विभागचा शासन निर्णय क्र बीसीए2009/प्रक्र108/कामगार7-अ/दि.17/06/2010 अन्वये विहीत केलेल्या कार्यपध्दती नुसार कामगार कल्याण उपकराचा भरणा करण्यात यावा.
10. बांधकाम प्लॅय अॅश विटाचा वापर करणे बंधनकारक राहील.
11. जागेच्या मालकी हक्काबाबत व जागेचे हद्दीबाबत अथवा भूखंडाच्या सिमांकनाच्या अनुषंगाने वाद निर्माण झाल्यास त्यास अर्जदार स्वतः जबाबतदार राहील.
12. विद्युत वाहीनीपासुन सुरक्षित अंतर सोडून बांधकाम करावे. कुठल्याही प्रकरचा अपघात झाल्यास अर्जदार स्वतः

जबाबदार राहील.

13. प्रस्तुतची बांधकाम परवानगी आदेश अर्जदार यांनी सादर केलली माहिती व सहायक संचालक नगर रचाना अकोला यांचे अभिप्राया नुसार देण्यात येत आहे. बांधकामाचे हद्दीबाबत मालकी हक्कबाबत कोणताही वाद उद्भवल्यास अर्जदार स्वतः जबाबदार राहील व बांधकाम परवानगी रद्द समजण्यात येईल.

14. प्रकरणात सोबत नकाशावर लाल रंगाने दुरुस्त केल्याप्रमाणे बांधकाम करणे बंधनकारक असुन यामध्ये बदल करता येणार नाही. तसेच बांधकामाचा वापर फक्त निवासी प्रयोजनाकरीताच करीताच करता येईल त्यात बदल करावयाचा असल्यास पुर्व परवानगी घेण आवश्यक आहे.

15. प्रकरणात प्रस्तावित बांधकामा संदर्भातील परवानगी सहायक संचालक नगर रचना अकोला यांनी जागेवर / भुखंडावर बांधकाम रेखान नकाशावर दर्शविल्या प्रमाणे कोणतेही विद्यमान बांधकाम नसल्याचे समजुन बांधकामास शिफारस केल्याप्रमाणे देण्यात येत आहे. याबाबत कोणतेही तक्रार, वाद निर्माण झाल्यास हा आदेश रद्द समजण्यात यावा.

16. भुखंड एकत्रीकरणाची परवानगी अर्जदार यांचे विनंतीवरुन सहायक संचालक, नगर रचना अकोला विभाग अकोला यांचे शिफारशीचे अनुषंगाने देण्यात येत आहे. तथापी सदरहू भूखंडावरील बांधकाम परवानगी ही एक वर्षापर्यंत वैध राहील.

दिनांक - 03 / 11 /2020

( डॉ. निलेश अपार )
उपविभागीय अधिकारी,
अकोला

प्रतिलिपी- १. तहसिलदार, अकोला यांना महीती तथा उचित कार्यवही करीता अग्रेषीत

२. तलाठी मौजे चांदुर ता. जि. अकोला मार्फत तहसिलदार, अकोला यांना उचित कार्यवाही करीता अग्रेषीत.

३. सचिव ग्राम पंचायत, चांदुर ता. जि. अकोला यांना माहीतीकरीता रवाना.

४. अर्जदार - श्री दिलीप डि. चौधरी रा. शास्त्री नगर अकोला ता. जि. अकोला यांना आदेश व मंजूर अभिन्यास नकाशाची 1 प्रतसह माहिती करीता रवाना.

( डॉ. निलेश अपार )
उपविभागीय अधिकारी,
अकोला